# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-१
## <u>सभावृत्तांत</u>

दिाांक - ०६.०७.२०१० वेळ- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पहिली सभा (विशेष सभा) मंगळवार दिनांक ०६.०७.२०१० रोजी दुपारी १२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
३. मा.अजित दामोदर गव्हाणे
४. मा.दत्तात्रय बाबुराव साने
५. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब
६. मा.बाराहाते शरद भगवंतराव

याशिवाय मा.देशमुख- सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मी आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे याठिकाणी सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत क्रिडा समितीच्या सभापतींची नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे क्रिडा समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ - मा.क्रिडा समितीच्या सभापतींची नेमणुक करणे. मा.क्रिडा समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

---

| अ.क्र. उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|
| १)राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले | अजित दामोदर गव्हाणे | तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब |
| २)राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले | दत्तात्रय बाबुराव साने | वाघेरे प्रभाकर नामदेव |

---

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त दोन नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मा.क्रिडा समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती नामनिर्देशीत पत्र वैध ठरलेली आहेत.

त्यामध्ये मा.क्रिडा समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समिती सभापती पदासाठी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत त्यामध्ये मा.क्रिडा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
**( आर.के.गायकवाड )**
अप्पर जिल्हाधिकारी- पुणे
पिठासीन अधिकारी
क्रिडा समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती मा. राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक २ - मा.क्रिडा समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे.

मा.क्रिडा समितीचे उपसभापती पदावर नेमणुक करणेकामी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|
| १) तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब | वाघेरे प्रभाकर नामदेव | दत्तात्रय बाबुराव साने |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांच्याकडे सुपूर्द केले. मा.सभापती यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.सभापती** - मा.क्रिडा समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ते नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. त्यामध्ये उपसभापती, क्रिडा समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे.

१) तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २
दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समिती उपसभापती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले असुन वैध ठरलेले असल्याने मा.क्रिडा समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०६.०७.२०१०
सूचक :- मा.दत्तात्रय साने अनुमोदक :-मा.प्रभाकर वाघेरे

मा.क्रिडा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी दुपारी ४.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले)
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९६९/१०
दिनांक- ०६/०७/२०१० चे लगत

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.